**धनगर समाज बांधवाच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम**
**भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजासाठी घरे बांधण्याची योजना राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**इमाव, सावशैमाप्र, विजाभज, विमाप्र कल्याण विभाग**
**शासन निर्णय : गृनियो-२०१९/प्र.क्र. ०२/विजाभज-१**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
**दिनांक :** ०६ सप्टेंबर, २०१९.

वाचा : १) शासन निर्णय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्रमांक सीबीसी-२०१९/ प्र.क्र.१२१/मावक, दिनांक ७/८/२०१९.
२) शासन निर्णय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग : क्र.गृनियो-२०१७/ प्र.क्र.६०/विजाभज-१, दिनांक २४/१/२०१८.
३) शासन शुध्दीपत्रक विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र.गृहनि-२०१७/ प्र.क्र.६०/विजाभज-१, दिनांक ८/१/२०१९.
४) शासन शुध्दीपत्रक विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र.गृहनि-२०१७/ प्र.क्र.६०/विजाभज-१, दिनांक २४/१/२०१९.

**प्रस्तावना :-**

धनगर सामाजाच्या आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक २/३/२०१९ रोजी सहयाद्री अतिथीगृह, मलबार हील, मुंबई येथे झाली. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, आदिवासी विकास विभाग तसेच सामाजिक न्याय विभागाच्या धर्तीवर राज्यातील ग्रामीण भागातील धनगर समाजातील लोकांसाठी घरकुल योजना सुरु करावी. पहिल्या टप्प्यात दहा हजार (१०,०००) घरकुले बांधून देण्यात यावे. यासाठी वित्तीय तरतुद उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

त्यानंतर जुलै, २०१९ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांनी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणात धनगर समाजाच्या विकासासाठी विविध २२ योजना राबविण्याचा शासनाचा मानस असल्याची घोषणा करण्यात आली आहे. सदर घोषणेची अंमलबजावणीसाठी रुपये १०००.०० कोटी एवढा निधीची अर्थसंकल्पीय तरतुद करण्याची घोषणा करण्यात आली आहे. गेली अनेक वर्षे विकासापासून दूर असलेल्या विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील धनगर प्रवर्गातील लोकांचा सर्वांगीन विकास व्हावा व त्यांना स्थिरता यावी यासाठी भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या लोकांसाठी राज्यात ग्रामीण भागात घरकुल योजना राबविण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव दिनांक ३०.७.२०१९ रोजी मा. मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता त्यास मा. मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. मा. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजासाठी १०,००० घरे बांधून देण्याची योजना मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

वरील प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन धनगर समाजाच्या मागण्यांच्या अनुषंगाने दिनांक ३०/७/२०१९ रोजी मा. मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार भटक्या जमाती-क प्रवर्गातील ग्रामीण भागातील धनगर समाजाच्या लोकांसाठी दहा हजार (१०,०००) घरकुले बांधून देण्याच्या निर्णय घेण्यात आला असून यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रुपये १५०.०० कोटी एवढया अंदाजित खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

२. मा. मंत्रिमंडळाने दिनांक ३०/७/२०१९ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील भटक्या जमाती-क प्रवर्गातील ग्रामीण भागातील धनगर समाजाच्या लोकांकरिता (१०,०००) दहा हजार वैयक्तिक लाभार्थी यांचेसाठी घरकुले बांधण्यासाठी व त्यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी रुपये १५०.०० कोटी इतक्या निधीस मान्यता देण्यात येत आहे.

३. राज्यातील ग्रामीण भागात वास्तव्यास असणाऱ्या भटक्या जमाती-क प्रवर्गासाठी धनगर समाजासाठी विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागस वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागामार्फत विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील लोकांकरिता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना सुरु आहे. सदरहू योजनेमध्ये वाचा येथील अ.क्र. १ ते ३ मधील शासन निर्णय व वेळोवेळी शुध्दीपत्रकानुसार सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. सदरील योजना वैयक्तिक लाभार्थ्यांसाठीसुध्दा राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्याच धर्तीवर भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या लोकांसाठी (१०,०००) दहा हजार वैयक्तिक लाभार्थी यांचेसाठी घरे बांधून देण्याच्या योजनेस शासन याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

४. यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेसाठी वैयक्तिक घरकुलासाठी असलेले सर्व शासन निर्णय तसेच याबाबत शासन वेळोवेळी जे निर्णय घेईल ते सर्व निर्णय, अटी / शर्ती इत्यादी या योजनेसाठी लागू राहतील. सदरहू योजना राबविण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीस अधिकार राहतील. लाभार्थी निवडीचे अधिकार समितीस राहतील. वैयक्तिक लाभार्थी यांचे घरकुलाला प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांची समिती असेल मात्र निधी वितरणासाठी प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेच्या आदेशासह शासनास पाठवावे आणि त्यानुसार शासन निधी वितरण करेल तसेच ही योजना ग्राम विकास विभागाचे गृहनिर्माण कक्ष मार्फत राबवावी.

५. सदरहू योजना ग्राम विकास विभागाच्या मान्यतेच्या अधिन राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. यावर होणारा खर्च सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीतून भागवावा व तो खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा:-

मागणी क्रमांक झेडजी-३

२२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण

०३, मागासवर्गांचे कल्याण,

१०२, आर्थिक विकास

(०१) विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागा प्रवर्ग यांचे कल्याण

(०१) (०३) विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्याकरिता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना (कार्यक्रम) (२२२५ई८२१)

३१, सहायक अनुदाने (वेतनेत्तर)

७. सदर शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र......, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०९०६१८१०४०४७२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.09.06 18:16:23 +05'30'

**( भा. र. गावित )**
**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खा.स. मंत्रालय, मुंबई.
७. मा. विरोधी पक्ष (विधान परिषद), विधानभवन, मुंबई.
८. मा. विरोधी पक्ष (विधान सभा), विधानभवन, मुंबई.
९. सर्व मा. विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ, मुंबई.
१०. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
११. सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग.
१२. प्रधान सचिव (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग), मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव (ग्राम विकास विभाग), बांधकाम भवन, मुंबई.
१४. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे.
१५. जिल्हाधिकारी (सर्व)
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व) जिल्हा परिषद.
१७. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नवी मुंबई.
१८. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व)
१९. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)
२०. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२१. निवडनस्ती (विजाभज-१)